सत्र - 2016 - 17

# वर्षिक अहवाल

## राज्यशास्त्र विभाग

शैक्षणिक सत्र २०१६–१७ मध्ये राज्यशास्त्र विभागाचे वतीने दरवर्षीप्रमाणे विविध अभ्यासपुरक व समाजाभिमुख कार्यक्रम राबविण्यात आले.

विशेष म्हणजे यावर्षी नोव्हेंबर–२०१६ मध्ये झालेल्या नगर पालीका निवडणुकीपूर्वी सुदृढ लोकशाही निर्मीतीच्या दृष्टीने मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणुन 'मतदार जागृतीचा कार्यक्रम' राबविण्यात आला.

मतदार जागृतीच्या मोहीमेत महाविद्यालयासह चिखली येथील जय अंबे जेष्ठ नागरिक सेवा संस्था व श्री रेणुका माता महीला जेष्ठ नागरिक बहुउद्देशिय सेवा संस्था या जेष्ठ नागरिक संघटना हिरीरीने सहभागी झाल्या. मतदार जागृती अनुषंगाने त्यांनी छापलेले २००० पॉम्पलेट शहरातील विविध भागात राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी वाटुन मतदार जागृती केली.

२६ नोव्हेंबर रोजी 'सेविधान दिनानिमित्त' चिखली शहरातुन काढण्यात आलेल्या रॅलीचा समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाटीकेत करण्यात आला.त्याठिकाणी संविधानाचे महत्व या विषयावर प्राचार्य डॉ. एन. बी. भुसारी, राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. जे. जे. जाधव, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. डी. आर. उन्हाळे, प्रा. एम. ए. पवार यांनी विचार व्यक्त केले. यावेळी जेष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी व महाविद्यालयातील अनेक शिक्षक उपस्थित होते.

तसेच मानवी हक्क जनजागृतीच्या निमीत्ताने १० डिसेंबर रोजी 'जागतीक मानवी हक्क' दिनाचे आयोजन राज्यशास्त्र विभागाचे वतीने करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. जे. जे. जाधव व प्रा. डी. आर. उन्हाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे २५ जानेवारी रोजी 'राष्ट्रीय मतदार दिनानिमीत' आयोजित कार्यक्रमात तहसिलदार श्री विजय लोखंडे प्रमुख पाहुणे म्हणुन तर प्राचार्य डॉ. एन. बी. भुसारी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उपस्थीत होते. कार्यक्रमाचे शेवटी सर्व कर्मचारी व विद्यार्थी यांनी प्रामाणिकपणे मतदान करण्याची व मतदानासाठी इतर नागरिकांना प्रोत्साहीत करण्याची शपथ घेण्यात आली या कार्यक्रमास व्यासपिठावर प्रा. पेन्शनवार, प्रा. डॉ. गारोडे, प्रा. बोबडे, प्रा. डॉ. व्ही. आर. पडवाल, डॉ. कलाखे, प्रा. पवार, प्रा. मेंढे. हे प्रामुख्याने उपस्थित होते.

यशिवाय बुलडाणा जिल्हा राज्यशास्त्र अध्ययन व संशोधन मंच यांचे वतीने मला महाविद्यालय, बुलडाणा येथे आयोजित जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेत तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापिठाद्वारे आयोजित 'बुलडाणा जिल्हास्तरीय अविष्कार स्पर्धेत कु. कल्याणी अशोक सौदडकर व कु. सुषमा वसंतराव काशिकर यांनी राज्यशास्त्र विभागाचे वतीने भाग घेऊन संशोधन पेपर सादर केले.

त्याचप्रमाणे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे दि. ५ डिसेंबर २०१६ रोजी विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने अमरावती आयोजीत **'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील युवकांचा वाढता सहभाग सुदृढ लोकशाहीचे द्योतक आहे'** या विषयावरील आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत राज्यशास्त्र विभागातील बि. ए. भाग ३ चे विद्यार्थी कु. किरण इंगळे व श्री राजेश नेमाडे यांनी संहभाग घेतला.

**विधीमंडळ सांसदीय अभ्यास वर्गात सचिन खडके यांचा सहभाग:–**

राज्यशास्त्र विभागातील एम. ए. भाग–१ चे विद्यार्थी सचिन खडके यांनी नागपूर येथे आयोजित हिवाळी राज्यविधीमंडळ अधिवेशनाच्या ४६ व्या सांसदीय अभ्यास वर्गात सहभाग घेतला होता. हा अभ्यास वर्ग सांसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा यांनी ७ ते १४ डिसेंबर–२०१६ या कालावधीत आयोजित केला होता.

व्यक्तीमत्व विकास व नोकरीसाठी इंग्रजी भाषेतील संभाषणाचे महत्व या विषयावर इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. एस. आय. जुक्कलकर यांनी दि. १९ जानेवारी २०१७ रोजी व्याख्यान दिले. या दरम्यान इंग्रजी भाषेचे महत्व विशद करताना ते म्हणाले, 'आजच्या आधुनिक काळात खाजगी व्यवसाय असो की सरकारी नोकरी असो, इंग्रजी भाषेचे ज्ञान महत्वाचे आहे. डेव्हीड ग्रेडॉल या भाषा शास्त्रज्ञाच्या मता नुसार, जगातील अनेक खाजगी क्षेत्रामध्ये रोजगाराच्या प्रचंड संधी उपलब्ध आहेत. परंतु ज्ञान असुनही भारतीय विद्यार्थी इंग्रजी भाषेच्या संभाषण कौशल्या अभावी मागे पडत आहे. म्हणुन विद्यार्थ्यांनी न्युनगंड सोडून इंग्रजी भाषा आत्मसात करावी. या विषयावर त्यानी चित्रफिती द्वार विद्यार्थ्यांना भाषेचे कौशल्य व त्याचे सकारात्मक परिणाम या विषयी माहीती दिली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व आत्मविश्वास जागृत झाला. यावेळी इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. गौतम आंभोरे, तसेच प्रा. किरण पडघान. प्रा. आनंद साबळे यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले.

याशिवाय दिनांक २७ जानेवारी २०१७ रोजी 'हॉटेल मॅनेजमेंट क्षेत्रातील संधी या विषयावरील कार्यशाळेत आयसीई कॉलेज ऑफ मॅनेजमेंट बुलडाणा येथील प्रा.जयप्रधान केरळ यांनी चित्रफीतीद्वारे उत्कृष्ट मार्गदर्शन केले. हॉटेल मॅनेजमेंट मधील विविध अभ्यासक्रम, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या हॉटेल मधी नोकरीच्या तसेच व्यावसायीक संधी याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रा. किरण पडघान यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा. कु. वाय. टी. सुरडकर, प्रा. भगत, प्रा. सर्जने, प्रा. सरप, प्रा. चिंचोले, प्रा. मापारी, यांचे सहकार्य लाभले.

१) प्रा.डॉ.जे.जे.जाधव

२) प्रा.डी.आर. उन्हाळे.